सागर प्रकाशनचे

सांजवार्ता

सर्वाधिक खपाचे सायंदैनिक

सोमवार, दि. १२ मार्च २०१२, औरंगाबाद- जालना


# अल्पसंख्यांक समाजात उत्कृष्ट काम करणाऱ्या युवकांचा सत्कार



अल्पसंख्यांक समाजाच्या सत्कार सोहळ्यात विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्याबद्दल राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री राजेश टोपे यांच्या हस्ते सत्कार स्वीकारताना रियाज खान, मुजफ्फर अहेमद, व मिर्झा अन्वर बेग.

औरंगाबाद, दि. १२ (सांजवार्ता ब्यूरो) : आझाद अली शाह शिक्षण संस्था खडकेश्वर, औरंगाबाद यांच्या वतीने आयोजित सत्कार समारंभ नुकताच तापडिया नाट्य मंदिरात घेण्यात आले. कार्यक्रमास मुस्लिम अल्पसंख्याक समाजात उत्कृष्ट काम करणाऱ्या समाजसेवकांचा राजेश टोपे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी महापौर मनमोहनसिंग ओबेरॉय, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प. शहर अध्यक्ष मुश्ताक अहेमद व संस्थेच्या अध्यक्षा सुरैया खान, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस साजिद पाशा आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बी.ई. सिव्हील मध्ये स्वर्णपदक विजेते व राज्यपालांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानीत रियाज बिसमिल्ला खान, हज यात्रेकरूंना गेल्या पाच वर्षांपासून विमानतळावर निःस्वार्थ सेवा करणारे मुजफ्फर बाऊद्दीन सिद्दीकी तसेच सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रात उत्कृष्ट काम करणारे राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे जालना शहर अध्यक्ष तथा नगरसेवक मिर्झा अन्वर बेग यांचा महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री राजेश टोपे यांच्या हस्ते शाल श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी राजेश टोपे यांनी आपल्या भाषणात युवकांना विविध क्षेत्रांमध्ये उच्च शिक्षण घेऊन आपले नाव समाजामध्ये नाव लौकिक करून स्वतःची ओळख निर्माण करावी, अशा व्यक्तींना सामाजिक संस्थांनी वेळोवेळी सन्मानीत करून उच्च कार्य करण्यासाठी तरुणांना प्रोत्साहित करावे यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढेल, त्यातून स्वतःची समाजाची व देशाच्या प्रगतीस हातभार लागेल, असे प्रतिपादन केले. साजीद पाशा यांनी सत्कारमूर्तींचे परिचय करून दिल्यावर त्यांच्या महत्त्वपूर्ण कार्यात योगदानाबद्दल कौतूक करून अभिनंदन केले. व अशाच प्रकारे इतरांना अशा कार्यात सामवून घेऊन त्यांनाही प्रोत्साहन द्यावे, असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरीफ शेख यांनी तर मुकिम पटेल यांनी आभार मानले.